वांद्रे रेक्लमेशन येथील जागेच्या विकासासाठी तीन निविदा

'अदानी', 'एल ॲण्ड टी', 'मायफेअर' कंपन्या स्पर्धेत

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वांद्रे रेक्लमेशन येथील मोक्याच्या ठिकाणच्या २९ एकर जागेवर उत्तुंग इमारत बांधण्याचा निर्णय घेतला आहे. संयुक्त भागिदारी प्रकल्पाअंतर्गत या जागेचा विकास करण्यासाठी मागविलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'अदानी', 'एल ॲण्ड टी' आणि 'मायफेअर' या कंपन्यांनी यासाठी निविदा सादर केल्या आहेत. या निविदांची छाननी करून लवकरात लवकर निविदा अंतिम करण्याचे 'एमएसआरडीसी'चे उद्दिष्ट आहे. या जमिनीच्या विकासातून 'एमएसआरडीसी'ला आठ हजार कोटींहून अधिक महसूल मिळण्याची शक्यता आहे.

वांद्रे-वरळी सागरी सेतूलगत 'एमएसआरडीसी'चे मुख्यालय आहे. या मुख्यालयानजीकच २९ एकर जागा असून, त्याचा वापर 'एमएसआरडीसी'कडून वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या कामाअंतर्गत कास्टींग यार्ड म्हणून करण्यात आला होता. याच जागेचा आता विकास करून निवासी वा



व्यावसायिक इमारत उभारून त्यातून महसूल मिळविण्याचे 'एमएसआरडीसी'चे उद्दीष्ट आहे. या जागेच्या विकासकासाठी जानेवारीत विकासक नियुक्त करण्याकरिता 'एमएसआरडीसी'ने स्वारस्य निविदा जारी केल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. निविदापूर्व बैठकीत यासाठी गोदरेज प्रॉपर्टीज, अदानी रिॲलिटी, सनटेक रिॲलटी, के. रहेजा, एल ॲण्ड टी रिॲलटी, वाधवा ग्रुप, रुणवाल, ओबेरॉय रिअलटी, लोढा आदी कंपन्यांनी उत्सुकता दाखविली होती. पण प्रत्यक्षात मात्र तीनच कंपन्यांनी निविदा सादर केल्याचे स्पष्ट झाले.

वांद्रे रेक्लेमेशन येथील जागेचा विकास करण्यासाठी तीन कंपन्यांनी निविदा भरल्या आहेत, अशी माहिती 'एमएसआरडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

रेल्वे रूळ ओलांडताना मोटरमनचा मृत्यू

मुंबई : भायखळा-सॅन्डहर्स्ट रोड येथून मोटरमन मुरलीधर शर्मा (५४) रेल्वे रूळ ओलांडत होते. त्यावेळी त्यांना प्रगती एक्स्प्रेसची जोरदार धडक बसल्याने त्यांचा मृत्यू झाला.

मोटरमन शर्मा शुक्रवारी सकाळी हार्बर रेल्वे मार्गावर पनवेल-सीएसएमटीदरम्यान लोकल चालवत होते. त्यांच्याकडून कुर्लादरम्यान नकळतपणे सिग्नलचा नियम मोडला गेला. त्यानंतर त्यांनी सीएसएमटीला व्यवस्थितपणे लोकल आणली. मात्र सिग्नलचा नियम मोडल्याने कडक कारवाई होईल यासह अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले. यावेळी कामानिमित्त भायखळा येथे रेल्वे रूळ ओलांडताना प्रगती एक्स्प्रेसची धडक लागून शर्मा यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सुरू आहे, असे सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी सांगितले.

जादा कामाची सक्ती

मोटरमन मुरलीधर शर्मा यांनी गुरुवारी सकाळी एका पाळीचे काम करून सायंकाळी पुन्हा जादा काम केले. त्यानंतर पुन्हा शुक्रवारी कर्तव्य बजावताना त्यांच्याकडून नकळतपणे सिग्नलचा नियम मोडला गेला. मध्य रेल्वे प्रशासन मोटरमनवर जादा काम करण्याची सक्ती करत आहे. त्यामुळे मोटरमन तणावाखाली आहे, असा आरोप करत सर्व मोटरमनकडून जादा काम बंदची हाक दिली आहे.

डॉक्टरच्या हत्येतील आरोपीला अटक

मुंबई : उत्तर प्रदेशमधील डॉक्टरच्या हत्येप्रकरणी २२ वर्षीय आरोपीला पकडण्यात गुन्हे शाखेला यश आले. एक पिस्तूल व तीन काडतुसांसह आरोपी मंगेश कुमार यादवला अटक करण्यात आली होती. चौकशीत त्याचा उत्तर प्रदेशातील हत्येत सहभाग उघड झाला होता. आरोपीविरोधात उत्तर प्रदेशात ९ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

गुन्हे शाखेच्या कक्ष ९ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने मंगेश यादवला अटक केली. त्याच्याकडून एक पिस्तूल व दोन काडतुसे जप्त करण्यात आली होती. याप्रकरणी भारतीय हत्यारबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीत आरोपीने उत्तर प्रदेशात एका डॉक्टरची हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहेत.

आरोपीविरोधात नऊ गंभीर गुन्हे दाखल असून याबाबतची माहिती उत्तर प्रदेश पोलिसांना देण्यात आली आहे. लवकरच उत्तर प्रदेश पोलिसांचे पथक आरोपीचा ताबा घेणार आहेत.

अश्वजीत गायकवाडविरोधात हत्येचा गुन्हा नोंदवण्यासाठी पीडितेची याचिका

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : प्रेयसीला मोटारगाडीने धडक देऊन गंभीर जखमी केल्याच्या प्रकरणात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांचे पुत्र अश्वजित गायकवाड यांच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपाप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, या मागणीसाठी पीडितेने उच्च न्यायालयात याचिका केली आहे.

पीडितेच्या याचिकेवर न्यायमूर्ती प्रकाश नाईक आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठासमोर पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे. पीडितीने केलेल्या याचिकेनुसार, अश्वजीत गायकवाड यांनी तिचा जीव घेण्याचा प्रयत्न केला. या घटनेत तिला गंभीर दुखापत झाली होती. पीडितेने पोलिसांत याप्रकरणी तक्रार नोंदवली.

नोंदवलेल्या गुन्ह्यानुसार, ११ डिसेंबर रोजी घोडबंदर मार्गावरील एका हॉटेलजवळ पीडित तरूणी अश्वजीत गायकवाड यांना भेटायला गेली होती. त्यावेळी, दोघांमध्ये भांडण झाले. नंतर, पीडित तरूणी गायकवाड यांच्या मोटारगाडीमधून तिचे सामान काढून जात असताना मोटारगाडीने धडक दिली. तिला गंभीर दुखापत झाली.

याप्रकरणी कासारवडवली पोलिसांनी गायकवाड यांच्यासह तीन आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. या तिघांना अटक करण्यात आली, १८ डिसेंबर रोजी त्यांना जामीन मंजूर झाला होता. त्यानंतर, हे प्रकरण विशेष तपास पथकाकडे वर्ग करण्यात आले. तथापि, तपासकर्त्यांकडून फारशी प्रगती नसल्याचा आरोप पीडितेने याचिकेत केला आहे.

रायगड जिल्ह्यात पायाभूत सुविधांसह आरोग्यालाही बळकटी

(पान १ वरून) आणि ठाणे यासारख्या महानगरांच्या शेजारी असल्याने रायगडचे भौगोलिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच मुंबईचा महानगर क्षेत्राचा विस्तार हा रायगड जिल्ह्याच्या दिशेने सुरू झाला आहे. यामुळेच रस्ते, रेल्वे आणि विमानसेवेचे भक्कम जाळे जिल्ह्यात विकसित होऊ लागले आहे.

दळणवळणांच्या सोयीसुविधांबरोबरच आरोग्य, शिक्षण आणि पाणीपुरवठा या घटकांच्या विकासावर यंत्रणांनी लक्ष केंद्रित केले आहे. याचे सकारात्मक परिणाम दिसून येऊ लागले आहेत. जिल्ह्यातील वैद्यकीय सेवांच्या सक्षमीकरणावर गेल्या काही वर्षांत भर दिला गेला आहे. त्यामुळे आरोग्य सुविधा सुधारण्यास मदत झाली आहे. जिल्ह्यात सध्या १४ शासकीय रुग्णालये, १० शासकीय दवाखाने. ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८८ उपकेंद्रे आहेत. खाजगी रुग्णालयांची संख्याही गेल्या काही वर्षांत वाढली आहे. त्यामुळे आरोग्याचा स्तर उंचावण्यास मदत झाली आहे. गरोदर महिलांची नियमित तपासणी, त्यांना लोह गोळ्यांचे वाटप, जिल्ह्यात रुग्णालय बाह्य प्रसूतीचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. त्यामुळे प्रसूती दरम्यान महिला आणि बालमृत्यूत घट झाल्याचे दिसून येत आहे.

स्वच्छता आणि पाणीपुरवठा यावर जिल्ह्याची कामगिरी लक्षवेधी ठरली आहे. जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे यासाठी रायगड जिल्हा परिषदेने केलेल्या विविध उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे स्रोत अशुद्ध होण्याचे प्रमाण घटले आहे. गेल्या वर्षभरात एकाही ग्रामपंचायतीला पिण्याच्या पाण्याचे धोकादायक स्रोत असल्यामुळे दिले जाणारे लालकार्ड एकाही ग्रामपंचायतीला देण्यात आलेले नाही. त्यामुळे जलजन्य आजारांना आळा बसण्यास मदत झाली आहे. जिल्ह्यात शंभर टक्के गावे ही हागणदारीमुक्त झाली आहेत. त्यामुळे स्वच्छतेचा दर्जा उंचावला आहे.

शक्तिस्थळे : कर्जत, खालापूर, रसायनी, पनवेल येथे शैक्षणिक हब. आंतरराष्ट्रीय विमानतळ, बंदर विकास गतीने महामार्गांची कामे वेगाने.

आव्हाने : वाढत्या औद्योगिकीकरणाचा शेती, मासेमारीवर परिणाम. खरीपा लागवड क्षेत्रात दहा वर्षांत तीस हजार हेक्टरची घट

धोके : शेतीत यांत्रिकीकरणाचा आभाव आणि सिंचनाच्या सुविधेची कमतरता, कामगारांची चणचण प्रकल्प उभारणीत स्थानिकांकडून होणारा विरोध आणि भुसंपादनात येणाऱ्या अडचणी

संधी : पनवेल आंतरराष्ट्रीय विमानतळ, दिघी बंदर, अलिबाग-विरार बहुउद्देशीय मार्गिका, रेवस रेड्डी सागरी मार्ग यांमुळे जिल्ह्यातील दळणवळणाला चालना. पर्यायाने औद्योगिकीकरण, शहरीकरणालाही वेग.

आणखी तिघांना 'भारतरत्न'

(पान १ वरून) आणि जागतिक स्तरावरील कृषी शास्त्रज्ञ स्वामिनाथन यांनी राष्ट्रविकासात योगदान दिले, असेही पंतप्रधान म्हणाले.

चौधरी चरणसिंह यांना भारतरत्न देऊन सन्मानित केले जात आहे हे आमच्या सरकारचे भाग्य आहे आणि ते देशासाठी त्यांच्या अतुलनीय योगदानाला समर्पित आहे. आमदार म्हणून असो, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री किंवा देशाचे गृहमंत्री म्हणून, त्यांनी नेहमीच राष्ट्रनिर्मितीच्या प्रयत्नांना गती दिली आणि आणीबाणीच्या विरोधातही ठामपणे उभे राहिले, अशा शब्दांत मोदी यांनी चरणसिंह यांचा गौरव केला. ''माजी पंतप्रधान नरसिंह राव हे एक विद्वान राजकारणी होते आणि त्यांनी विविध पदांवर देशाची सेवा केली. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने भारताला आर्थिकदृष्ट्या प्रगत बनवण्यासह, देशाच्या समृद्धी आणि विकासाचा भक्कम पाया घातला. भारताचे परराष्ट्र धोरण, भाषा आणि शिक्षण क्षेत्रातील राव यांचे योगदान त्यांचा बहुआयामी वारसा अधोरेखित करते. नरसिंह राव यांनी केवळ महत्त्वपूर्ण बदलांद्वारे भारताला मार्गदर्शन केले नाही तर त्याचा सांस्कृतिक आणि बौद्धिक वारसाही समृद्ध केला,'' असे मोदी म्हणाले.

कृषी क्षेत्रात अमूलाग्र बदल घडविणाऱ्या डॉ. स्वामीनाथन यांच्याबाबत पंतप्रधानांनी गौरवोद्गार काढले. ''आव्हानात्मक काळात त्यांनी भारताच्या शेतीमध्ये स्वावलंबन साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि भारतीय शेतीच्या आधुनिकीकरणासाठी उत्कृष्ट प्रयत्न केले. डॉ. स्वामीनाथन यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने केवळ भारतीय शेतीचाच कायापालट केला नाही तर राष्ट्राची अन्नसुरक्षा आणि समृद्धीही सुनिश्चित केली. ६० आणि ७० च्या दशकात त्यांच्या नेतृत्वाखाली संशोधनामुळे देशात धान्य उत्पादनात विक्रमी वाढ झाली, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

'मुद्रा'तील थकीत कर्जे चार हजार २३४ कोटींवर

(पान १ वरून) असल्यामुळे 'जरा थकबाकीकडेही लक्ष द्या,' असे बँक अधिकाऱ्यांनी सुचवले आहे.

'मुद्रा' योजनेतून तीन श्रेणींत कर्ज दिले जाते. यामध्ये शिशू श्रेणीतून ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज मिळते. या श्रेणीमध्ये कर्जफेडीचे प्रमाण अधिक आहे. राज्यातील प्रलंबित आठ हजार ५०७ कोटी रुपयांपैकी ६४२ कोटी रुपयांची रक्कम थकीत आहे. हे प्रमाण केवळ आठ टक्के आहे. त्या पुढच्या श्रेणीतील कर्ज घेणाऱ्या म्हणजे रुपये ५० हजार ते पाच लाखांपर्यंत कर्ज घेणाऱ्यांचे थकीत कर्जाचे प्रमाण १४ टक्के आहे. या श्रेणीत २० लाख ६७ हजार २६३ खातेदारांपैकी दोन लाख २३ हजार ९५१ खातेदारांचे २,३५८ कोटींचे कर्ज थकीत आहे. या योजनेतून थेट १० लाख रुपये कर्ज मिळत असल्याने छोट्या उद्योजकांनी तरुण श्रेणीतून कर्ज मिळावे यासाठी प्रयत्न केले. स्थानिक पातळीवर नेत्यांना शिफारशी करायला लावल्या. या श्रेणीत विविध बँकांचे १,२३४ कोटी रुपयांचे कर्ज थकलेले आहे. तरुण श्रेणीतील थकीत कर्ज रकमेचे प्रमाण १० टक्के असल्याचे अहवाल बँकर्स समितीकडे देण्यात आले आहेत.

मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, बीड, जालना या जिल्ह्यांत कर्ज न फेडणाऱ्यांची संख्या अधिक आहे. परभणी जिल्ह्यात थकीत कर्जाचे प्रमाण दर वर्षी वाढत असल्याचे अग्रणी बँकांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

राज्यातील प्रमाण ११ टक्के

राज्यातील ६७ लाख ६२ हजार ८२३ मुद्रा लाभार्थ्यांना ३८ हजार ७८५ कोटींचे कर्ज वितरित करण्यात आले होते. त्यातील थकीत कर्जाचे प्रमाण ११ टक्के म्हणजे चार हजार २३४ कोटी एवढे आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाही अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार (₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२३ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२२ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०२२ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२३ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	४,७८९	४,२१५	३,५२०	१२,३७६	८,४७५	११,७५९
२. कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	२,२९४	(१,१३७)	५७१	८५४	२,८६१	२,४१०
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	२,२९४	(१,१३७)	५७१	८५४	२,८६१	२,४१०
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	२,२९४	(१,१३७)	५६४	८५४	२,८५४	२,४०२
५. कालावधीकरिता एकूण व्यापक/(तोटा) उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	२,२९६	(१,१५५)	५५१	८३७	२,८४९	२,४००
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	(११,६०४)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)*						
मूलभूत (₹)	०.९६	(०.४७)	०.२३	०.३६	१.१९	१.००
सौमिकृत (₹)	०.९६	(०.४७)	०.२३	०.३६	१.१९	१.००

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी केले गेले आहे आणि दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र कुमार अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: ०९ फेब्रुवारी, २०२४

हनीवेल

हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड
CIN: L29299PN1984PLC017951
नोंदणीकृत कार्यालय: ५६ व ५७, हडपसर इण्डस्ट्रियल इस्टेट, पुणे ४११ ०१३
दूरध्वनी: +९१ २० ७११४ ८८८८, ईमेल: HAIL.investorservices@honeywell.com I वेबसाईट: https://www.honeywell.com/in/en/hail

३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाहीच्या अलेखापरिक्षित वित्तिय निष्कर्षांचे विवरण

(रु. दशलक्षमध्ये)

अनु क्र.	तपशील	संपलेली तिमाही			संपलेली नऊमाही		संपलेले वर्ष
		डिसेंबर ३१, २०२३ अलेखापरिक्षित*	सप्टेंबर ३०, २०२३ अलेखापरिक्षित*	डिसेंबर ३१, २०२२ अलेखापरिक्षित*	डिसेंबर ३१, २०२३ अलेखापरिक्षित*	डिसेंबर ३१, २०२२ अलेखापरिक्षित*	मार्च ३१, २०२३ लेखापरिक्षित
१.	कामकाजापासून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१०,९९१	११,४४३	१०,४४९	३२,०८७	२६,९९४	३५,७५९
२.	कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी यांच्यापूर्वी)	१,७४५	१,६३९	१,४३७	४,७७६	४,३९७	५,९१३
३.	कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी यांच्यानंतर)	१,७४५	१,६३९	१,४३७	४,७७६	४,३९७	५,९१३
४.	कालावधीसाठी करोपरान्त निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी यांच्यानंतर)	१,२७९	१,२१९	१,०६१	३,५३२	३,२६०	४,३८०
५.	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [या कालावधीसाठी (करोपरान्त) नफा आणि इतर (करोपरान्त) सर्वसमावेशक उत्पन्न यांचा समावेश असणारे]	१,२४६	१,२३६	१,०३१	३,५३३	३,१७२	४,२७६
६.	समभाग भांडवल	८८	८८	८८	८८	८८	८८
७.	राखीव पुनर्मूल्यांकन राखीव वगळून						३१,७९७
८.	प्रती समभाग मिळकत (इपीएस) -						
	(अ) मूलभूत आणि सौम्यीकृत असाधारण बाबींपूर्वी (रु.)(वार्षिकीकृत न केलेले)	१४४.६०	१३७.८२	११९.९७	३९९.४२	३६८.६९	४९५.४०
	(ब) मूलभूत आणि सौम्यीकृत असाधारण बाबींनंतर (रु.) (वार्षिकीकृत न केलेले)	१४४.६०	१३७.८२	११९.९७	३९९.४२	३६८.६९	४९५.४०

*मर्यादित आढावा

नोंदी:

१. वर दिलेली माहिती ही सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अन्वये स्टॉक एक्स्चेंजेसकडे सादर केलेल्या वित्तिय निष्कर्षांच्या सविस्तर नमुन्याचा सारांश आहे. वित्तिय निष्कर्षांचा सविस्तर नमुना स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईट म्हणजेच www.bseindia.com आणि www.nseindia.com यांच्यावर उपलब्ध आहेत.
२. वरील निष्कर्षांचा लेखासमितीने आढावा घेतला आहे आणि ०८ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेतलेल्या त्याच्या सभेत संचालक मंडळाने त्याला मान्यता दिली आहे.

हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड करिता
आशिष मधुकर गायकवाड
व्यवस्थापकीय संचालक
डिआयएन: ०७५८५०७९

स्थळ: पुणे
दिनांक: ०८ फेब्रुवारी, २०२४

भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित

(भारत सरकारचा उपक्रम)
शिपिंग हाउस, २४५, मदाम कामा रोड, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१, इंडिया.
• दूरध्वनी: २२७७२५७६ • संकेतस्थळ: www.shipindia.com • Twitter: @shippingcorp
• CIN No.: L63030MH1950G0I008033

SCI Navratna Company (ISO 9001:2015, ISO 14001:2015 & ISO 45001:2018 Certified)

३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाही अखेरचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष

(रक्कम ₹ लाखात)

अ. क्र.	तपशील	स्वतंत्र			एकत्रित		
		३१.१२.२०२३ ला संपलेले तिमाही (अलेखापरीक्षित)	३१.१२.२०२३ ला संपलेले नऊमाही (अलेखापरीक्षित)	३१.१२.२०२२ ला संपलेले तिमाही (अलेखापरीक्षित)	३१.१२.२०२३ ला संपलेले तिमाही (अलेखापरीक्षित)	३१.१२.२०२३ ला संपलेले नऊमाही (अलेखापरीक्षित)	३१.१२.२०२२ ला संपलेले तिमाही (अलेखापरीक्षित)
१	परिचलनातून एकूण उत्पन्न	१,३६,२८६	३,७५,१६८	१,५२,११२	१,३६,३०२	३,७५,१९८	१,५२,१२८
२	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबीं)	१४,८६९	३५,४७२	२६,१६३	१५,०९९	४०,६२५	२८,२४४
३	कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपश्चात)	१४,८६९	३५,४७२	२६,१६३	१५,०९९	४०,६२५	२८,२४४
४	कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर)	१३,२०५	३२,०१६	२४,५८२	१३,४३५	३७,१६९	२६,६६३
५	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [कालावधीकरिता नफा/ (तोटा) (करपश्चात) आणि अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात)]	१४,३०४	३२,७५२	२४,५७७	१२,०९२	३५,५१५	२७,०७०
६	समभाग भांडवल	४६,५८०	४६,५८०	४६,५८०	४६,५८०	४६,५८०	४६,५८०
७	राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दाखविल्याप्रमाणे	-	-	-	-	-	-
८	प्रति समभाग प्राप्ती (₹१०/- प्रत्येकी) (अखंडित आणि खंडित परिचालनाकरिता) (₹ मध्ये)						
	मूलभूत :	२.८३	६.८७	५.२८	२.८८	७.९८	५.७२
	सौम्यिकृत :	२.८३	६.८७	५.२८	२.८८	७.९८	५.७२

अ. सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अनुसार स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल केलेल्या तिमाही आणि नऊमाहीचे आर्थिक निष्कर्षाच्या तपशिलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. तिमाही आणि नऊमाही आर्थिक निष्कर्षांचे तपशिलवार विवरण स्टॉक एक्सचेंजेसच्या संकेतस्थळावर (**www.bseindia.com** आणि **www.nseindia.com**) तसेच कंपनीच्या संकेतस्थळावर **www.shipindia.com** येथे उपलब्ध आहेत.

ब. दि. ३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाहीचे स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निकाल भारतीय लेखा मानदंड (इंड-एएस) चे अनुपालन करतात.

क. वरील निष्कर्ष दि. ९ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीद्वारे पुनर्विलोकित करण्यात आले व संचालक मंडळाद्वारे मंजूर करण्यात आले.

भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित करिता
कॅप्टन बी.के. त्यागी
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
DIN - 08966904

स्थान : मुंबई
तारीख : ०९.०२.२०२४

मालाचे परिवहन. जीवनात परिवर्तन.